# जनसंपर्क अधिकारी
**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**
**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे**
**फोन नं. ०२२-२९४५१००१**
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेसनोट १४६-२३** **दिनांक :- १०/०५/२०२३**

## विरार, मांडवी, पेल्हार पोलीस ठाणेत विविध गुन्हे, गहाळ/ हरविलेला ५०,६५,४८४/- रुपये किंमतीचा मुद्देमाल नागरिकांना करण्यात आला परत.

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील परिमंडळ-३ हद्दिमधील विरार, मांडवी, पेल्हार पोलीस ठाण्यांमध्ये दाखल असलेल्या विविध गुन्हयांतील हस्तगत केलेला एकुण ५०,६५,४८४/- रुपये किंमतीचा मुद्देमाल आज दिनांक १०/०५/२०२३ रोजी पिडीत व फिर्यादी/ तक्रारदार यांना परत करण्यात आला आहे. पोलीस ठाणे येथे दाखल असलेल्या गंभीर तसेच चोरी व घरफोडीसारख्या गुन्हयांची पोलीसांनी कौशल्यपुर्वक उकल करुन फिर्यादी यांचा आरोपीतांनी चोरुन किंवा जबरीने नेलेल्या किंमती वस्तू, गहाळ झालेले मोबाईल हॅन्डसेट इत्यादी गुन्हयाचे तपासादरम्यान हस्तगत करण्यात आले होते.

## विरार पोलीस ठाणे

विरार पोलीस ठाणेत दाखल विविध गुन्ह्यातील मुद्देमाल व प्रॉपर्टी मिसींग मधील गहाळ झालेली मुद्देमाल यांचा कौशल्याने तपास करुन २८ गुन्हयांची उकल केलेली आहे. नमुद गुन्हयातील आरोपीतांकडुन हस्तगत करण्यात आलेले सोने-चांदीचे दागिने, किंमती मोबाईल फोन, कार टेप, दुचाकी/चार चाकी वाहने, सायकल अशी एकुण ३२,८१,०७९/- रु. किंमतीचा मालमत्ता तसेच विरार पोलीस ठाणे दाखल प्रॉपर्टी मिसिंग मधील गहाळ झालेले वेगवेगळया कंपनीचे ०३,६८,९९९/- रु. किंमतीचे एकुण २३ मोबाईल फोनचा तांत्रिक पध्दतीने शोध घेवुन हस्तगत करुन एकुण ३६,५०,०७८/- रु. किंमतीचा मुद्देमाल हस्तगत केलेला आहे.

## पेल्हार पोलीस ठाणे

पेल्हार पोलीस ठाण्यातील विविधी शिर्षकाखाली दाखल असलेल्या गुन्हयांची उकल करुन आरोपीतांकडुन मालमत्ता जप्त करुन एकुण २० गुन्हयांची उकल व १२ गहाळ मोबाईलचा शोध घेवुन एकुण १३,१३,६००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत केलेला आहे.

## मांडवी पोलीस ठाणे

तसेच मांडवी पोलीस ठाण्यातील विविधी शिर्षकाखाली दाखल असलेल्या गुन्हयांची उकल करुन आरोपीतांकडुन मालमत्ता जप्त करुन एकुण ०५ गुन्हयांची उकल करुन गुन्हयातील आरोपीतांकडुन एकुण ०१,०१,८०६/- रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत केलेला आहे.

आज दिनांक १०/०५/२०२३ रोजी सायंकाळी १७:३० वाजताच्या दरम्यान विरार पोलीस ठाणे येथे घेण्यात आलेल्या मुद्देमाल हस्तांतरण कार्यक्रमादरम्यान पिडीतांना उपरोक्त मुद्देमाल पोलीसांनी कायदेशीर बाबींची पुर्तता करुन परत मिळवून दिल्याने संबंधित पिडीत व फिर्यादी यांनी मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीसांचे आभार मानून आनंद व्यक्त केला आहे.

सदरची कामगिरी मा. श्री. मधुकर पाण्डेय, पोलीस आयुक्त, मि.भा.व.वि पोलीस आयुक्तालय यांच्या आदेशाने श्री. सुहास बावचे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-३, यांचे मार्गदर्शनाखाली श्री. रामचंद्र देशमुख, सहायक पोलीस आयुक्त, विरार विभाग, वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री. राजेंद्र कांबळे विरार पोलीस ठाणे, वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री. वसंत लब्दे पेल्हार पोलीस ठाणे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. प्रफुल वाघ मांडवी पोलीस ठाणे तसेच संबधित पोलीस ठाणेचे गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अधिकारी व अमंलदार आणि मुद्देमाल कारकुन यांनी केली आहे.




Metro City Samachar
10 May 2023 5:36 pm


मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय
अंतर्गत
सहाय्यक पोलीस आयुक्त विरार विभाग
हस्ते
मा.श्री.रामचंद्र देशमुख सहा.पोलीस आयुक्त, विरार
मुद्देमाल हस्तांतर कार्यक्रम
श्री. वसंत लब्दे
श्री. प्रफुल्ल वाघ
मिरा-भाईंदर - वसई - विरार
तक्रार निवारण

-----oooo-----